आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ ऑक्टोबर २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- सरकारीसह आणि खासगी शाळेतले शिक्षक आणि कर्मचारी तसंच बँका, ट्रस्टमधल्या कर्मचाऱ्यांना जनगणनेचं काम लावलं जाणार

- दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारच्या सेवेतल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार

- भारत - अमेरिका यांच्यातला द्विपक्षीय व्यापार लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून व्यक्त

आणि

- महिला क्रिकेटमध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-ट्वेंटी सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

<><><><><>

गृह मंत्रालयानं जनगणना कायदा १९४८ अंतर्गत जनगणना दुरुस्ती नियम २०२६ लागू केले आहेत. याबाबत मंत्रालयानं आज राजपत्राद्वारे अधिसूचना जारी केली. या सुधारणेद्वारे जनगणना करण्यासाठी पात्र व्यक्तींची यादी वाढवली आहे. त्यानुसार, सरकारी, स्थानिक प्राधिकरणं, अनुदानित आणि विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमधले शिक्षक, तसंच संस्था किंवा ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांमधल्या शिक्षकांची नियुक्ती जनगणना कर्मचारी म्हणून केली जाऊ शकते.

या सुधारणेत केंद्र आणि राज्य सरकारं, स्थानिक प्राधिकरणं, तसंच विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले लिपिक आणि इतर अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम, वैधानिक संस्था, बँका, कंपन्या, विविध संस्था, सोसायट्या आणि ट्रस्ट यांचाही समावेश यात करण्यात आला आहे.

<><><><><>

सर्व उपलब्ध वैद्यकीय सेवा आणि सुविधांचे दर सर्वांना सहज दिसतील अशा जागी इंग्रजी आणि मराठीत फलकावर लावणं राज्यातल्या सर्व रुग्णालयांना राज्य सरकारनं

अनिवार्य केलं आहे. याचं उल्लंघन झालं तर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असं सार्वजनिक आरोग्य विभागाने आज जारी केलेल्या शासन निर्णयात म्हटलं आहे. सर्व प्रकारचे उपचार देणाऱ्या सर्व प्रकारच्या रुग्णालयांना हा नियम लागू असून, आयुष व्हिसा घेऊन उपचारासाठी आलेल्या परदेशी रुग्णांना त्यांच्यावर आकारल्या जाणाऱ्या शुल्काची स्पष्ट माहिती रुग्णालयांनी दिली पाहिजे, असंही जीआरमधे म्हटलं आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने गेल्या १२ ऑक्टोबरला दिलेल्या दिशानिर्देशांनुसार हा जीआर काढण्यात आला आहे.

<><><><><>

आरोग्याच्या फायद्यासंदर्भात दिशाभूल करणारे दावे करणाऱ्या फ्रीडम कुकिंग राइस ब्रॅन तेलाची विक्री केल्याप्रकरणी FSSAIनं जेमिनी, बिगबास्केट आणि फ्लिपकार्ट या कंपन्यांना नोटिसा बजावल्या आहेत. या तेलामुळे शरीरातलं वाईट कॉलेस्टेरॉल कमी होतं आणि चांगलं कोलेस्टेरॉल तसंच राहतं किंवा वाढतं, अशी चुकीची प्रसिद्धी कंपनीनं केली होती.

<><><><><>

गेल्या काही वर्षांत देशाच्या राज्यघटनेवर आणि लोकशाहीवर हल्ले करायचा प्रयत्न अनेकदा झाला, मात्र आपली राज्यघटना इतकी भक्कम आहे, की कोणीही भारताच्या लोकशाहीचं नुकसान करू शकलेलं नाही, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. मुंबई महापालिकेच्या शाळेत भारतीय संविधान या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केलं. तसंच 'स्मार्ट नागरिक - नागरिकशास्त्र आणि संविधानिक मूल्यं' या शालेय अभ्यासक्रम पुस्तकाचं आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'विद्यार्थी प्रेरणा- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकांचं प्रकाशन त्यांच्या हस्ते झालं. राज्यघटना जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत निर्णय घेण्याचा अधिकार संसदेकडेच असेल, असं त्यांनी सांगितलं. बांगलादेश, श्रीलंका किंवा नेपाळ सारखी परिस्थिती भारतात आणण्याचे मनसुबे उधळून लावण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

अंतर्गत आणि बाह्य धोके कितीही आले, तरी डॉक्टर आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेनेच गेल्या ७ दशकांमध्ये भारताला जोडून ठेवलं आहे, असं प्रतिपादन माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी यावेळी केलं.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ ऑक्टोबर २०२६ - शुक्रवार

<><><><>

कॉकरोच जनता पार्टीच्या लेहरा दो तिरंगा आंदोलनासाठी निघालेले पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके, नेहा बोरा यांच्यासह सुमारे दीडशे जणांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. कॅनॉट प्लेस इथं हे आंदोलन नियोजित होतं. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आज सकाळी दिपके यांची भेट घेतली आणि त्यांना नोटिस दिली. या आंदोलनामुळे सामान्य नागरिक, व्यापारी, प्रवासी, रुग्ण आणि इतरांच्या अधिकारांना बाधा येते, त्यामुळे त्यांनी हे आंदोलन करू नये, अशी सूचना या नोटिसमध्ये केली होती. मात्र तरीही दिपके आंदोलनाच्या ठिकाणी जायला निघाल्यानंतर त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

<><><><>

नवी दिल्लीत सीजेपी आंदोलनामुळे आपल्याला प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावं लागलं असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करावा, अशी विनंती विविध व्यापारी संघटनांनी केली आहे. आंदोलनामुळे १० तारखेपासून गेल्या ४ ते ५ दिवसात ग्राहक मुख्य बाजारपेठेकडे फिरकलेले नाहीत. आगामी सणासुदीच्या काळात ही परिस्थिती चिंताजनक होण्याची भीतीही संघटनांनी व्यक्त केली आहे. तसंच, झालेल्या आर्थिक नुकसानाचं मूल्यमापन करून ती रक्कम थेट आंदोलनांच्या आयोजकांकडून वसूल करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

<><><><>

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारच्या सेवेतल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा केलं जाणार आहे. विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी यासाठी तयारी दाखवली होती. त्यानुसार ऑक्टोबरच्या महिन्याच्या वेतनातून ही कपात होणार आहे. सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयं, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळ, मंडळं आणि इतर स्वायत्त संस्थेतल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचं वेतन या निधीत जमा केलं जाईल.

<><><><>

भारत अमेरिका व्यापार करार लवकरच पूर्ण होईल असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केली आहे. थायलंडमध्ये बँकॉक इथे सुरु असलेल्या जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या वार्षिक बैठकीदरम्यान अटलांटिक परिषदेत त्या बोलत

होत्या. भारत अमेरिका व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधले आर्थिक संबंध बळकट होतील, शिवाय जागतिक व्यापारावर सकारात्मक परिणाम होईल असं त्या म्हणाल्या. कराराचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून त्याचा कायदेशीर मसुदा तयार करण्याचं काम सुरु असल्याची माहिती वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी दिली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

मुस्लिम वैयक्तिक कायद्यांतर्गत सर्व प्रकारच्या तलाक प्रक्रियांसाठी समान सुरक्षात्मक उपाययोजनांची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि इतर संबंधित पक्षांकडून उत्तर मागितलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं ही याचिका तलाक-ए-हसन च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या प्रलंबित याचिकेसोबत जोडली आहे. तलाक-ए-हसनमध्ये तीन महिन्यांच्या कालावधीत दरमहा एकदा तलाक शब्द उच्चारला जातो. या काळात पती-पत्नी पुन्हा एकत्र राहू लागले नाहीत, तर तिसऱ्यांदा तलाक उच्चारल्यानंतर घटस्फोट पूर्ण होतो. या नवीन याचिकेत तलाक-ए-हसन आणि इतर प्रकारच्या एकतर्फी, न्यायालयबाह्य घटस्फोटांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

<><><><><>

सण-उत्सवांच्या काळात साखरेचा पुरवठा पुरेसा व्हावा यासाठी, ऑक्टोबर महिन्यात उत्पादित झालेली साखर, नियमित मासिक कोट्याव्यतिरिक्त, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यात विकण्याची परवानगी केंद्र सरकारनं साखर कारखान्यांना दिली आहे. केंद्रीय अन्न मंत्रालयानं आज सर्व साखर कारखान्यांना तसे निर्देश दिले आहेत. ही विक्री संबंधित महिन्यांसाठी निश्चित केलेल्या नियमित मासिक विक्री कोट्याव्यतिरिक्त असेल, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशन चे अध्यक्ष प्रफुल विठलानी यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

<><><><><>

सौदी अरेबियातल्या भारतीयांनी स्थानिक अधिकाऱ्यांच्या सूचनांचं पालन करावं, आणि हवाई हल्ला झाला तर सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितलं आहे. गेल्या शनिवारी रियाध इथल्या विमानतळावर झालेल्या हल्ल्यात जखमी

झालेल्या भारतीयांपैकी २ जण अजूनही गंभीर स्थितीत आहेत, तर ३ जण बरे होत आहेत, असं मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. एअर इंडियाची रियाधहून येणारी विमान उड्डाणं येत्या मंगळवारपर्यंत रद्द केली आहेत. दम्माम, जेद्दा आणि मदीना इथून भारतात येण्यासाठी विमान उड्डाणं सुरु आहेत. दम्मामहून मुंबईसाठी फ्लायडीलची दोन विशेष उड्डाणं उद्या आणि परवा नियोजित आहेत. तसंच बहारिन, कुवैत किंवा कतारमार्गेही आवश्यक व्हिसा घेऊन भारतात येता येईल. उमरा यात्रेसाठी किंवा इतर कारणांनी सौदी अरेबियाला जाऊ इच्छिणाऱ्यांनी या सर्व बाबींचा विचार करुन प्रवासाचं नियोजन करावं, असा सल्ला मंत्रालयाने दिला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत ओरेगॉन राज्यामध्ये एका प्राथमिक शाळेत झालेल्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला. हल्लेखोर १६ वर्षांचा असून त्याने काल या शाळेत घुसखोरी करून गोळीबार केला. शाळेच्या आवारात एका स्थानिकाने हा हल्ला रोखण्याचा प्रयत्न केला. यात या हल्लेखोराचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातल्या टी-ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज रायपूर इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा झिम्बाव्बेच्या १५ षटकात २ बाद ८२ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**